# मुलांसाठी बाइबल
## प्रस्तुत



# सुंदर राणी एस्तेर

लेखक: Edward Hughes
रेखाचित्रकार: Janie Forest
अनुवादक: Rev. Shilas Gavit
रूपान्तरकार: Ruth Klassen

60 गोष्टींतील 30 (पहिली)

**www.M1914.org**

***Bible for Children,*** *PO Box 3, Winnipeg, MB R3C 2G1 Canada*

परवाना (लाइसेंस): तुम्ही जोपर्यंत ही गोष्टविकत नाहीत, तोपर्यंत तुम्ही ती कॉपी किंवा मुद्रित करू शकता.

मराठी

Marathi

एस्तेर नावाची एक सुंदर मुलगी होती. तिच्या आईवडीलांच्या निधनानंतर मर्दखय नावाच्या तिच्या चुलत भावाने तिची काळजी घेऊन तिला लहानाची मोठी केली होती. चांगल्या मुलीप्रमाणे एस्तेर तिच्या चुलत भावाच्या आज्ञापालनात राहून त्याचा सन्मान करित असे.



1



एस्तेर पर्शिया देशात राहात होती. परंतू, एस्तेर पर्शियन नव्हती. ती यहुदी होती. तिचे पुर्वज युध्द्कैदी बनून त्या देशात आले होते. एस्तेरच्या दिवसांत पुष्कळ यहुदी पर्शियात राहात होते.

2


जगातील सर्व राजकुमारांसाठी पर्शियाच्या राजाने मोठी मेजवानी आयोजीत केली. लोकांनी खाणे पिणे केले. राणीनेहि राजमंदिरात स्त्रियांस मेजवानी दिली. राजमुकुट परिधान करुन राणीने तिचे सौदर्य लोकांसमोर दाखवावे अशी आज्ञा मद्यधुंद झालेल्या राजाने दिली. वश्ती राणीने लोकांसमोर येण्यास नकार दिला.
3
स्त्रियांनी त्यांच्या पतींचा सन्मान करावा हे दाखवण्यासाठी, राजाने एक नविन कायदा पास केला, त्याव्द्वारे वश्ती राणीचा राजमुकुट तिच्याकडून काढून घेण्यात आला. आता ती राणी राहिली नव्हती.
4
नविन राणीचा शोध घेण्यात आला. देशातील सर्व सुंदर मुलिंमधून राजाने एस्तेरला त्याची पत्नी म्हणून निवडले. त्याने राजमुकुट एस्तेरच्या मस्तकावर ठेवला. तिच्या चुलत भावाने सांगितल्यामुळे ती यहुदी आहे असे एस्तेरने राजाला सांगितले नव्हते.
5
एस्तेर कडून काही निरोप येतो का हे ऐकण्यासाठी एस्तेरचा चुलत भाऊ मर्दखय राजमहालाच्या दारातच राहात असे. एकदा राजाचे सेवक राजाला मारण्याचा कट करतांना मर्दखयने दोन ठिकाणी ऐकले. मर्दखयने राजाला याची माहिती दिली यामुळे राजाचे प्राण वाचले. त्या नोकरांना फाशीची शिक्षा दिली, आणि राजाच्या इतिहासाच्या पुस्तकात मर्दखयचे नाव लिहिण्यात आले.
6
राजा खालोखाल ज्याचा अधिकार होता त्याचे नाव हामान असे होते, तो फार श्रीमंत मनुष्य होता. एकाला सोडून – सर्वचजण हामानासमोर वाकून त्याला मुजरा करित असत. यहुदी असल्यामुळे मर्दखय केवळ एकाच जिवंत देवाची भक्ति करित असे.
7
हामान मर्दखयचा फार व्देष करित असे म्हणून त्याने हामानाला आणि पर्शियातील सर्व यहुदी लोकांना मारुन टाकण्याचा कट केला. कित्ती भयंकर ! दुष्ट हामानाने कपट कारस्थान करुन, एका ठराविक दिवशी पर्शियन राज्यातील सर्व यहुदी लोकांना मारुन टाकावे अशा आशयाच्या एका कायद्यावर राजाची सहि घेतली.
8


तो भयंकर असा कायदा होता. यहुदी आणि पर्शियन दोघांनी देखिल शोक केला. परंतू देवाने एस्तेरला राणी बनवले होते हे लक्षात असू द्या. आणि ती यहुदी होती. राजापासून ती तिचे रहस्य लपवून ठेविल का? किंवा, तिच्या लोकांचा बचवा करण्यासाठी ती तिचा जीव धोक्यात घालील?
9
देवाने एस्तेरला एक स्पष्ट योजना दिली. तिने राजा व हामानाला मेजवानीत आमंत्रित केले. तेथे राजाने एस्तेर जे काही मागेल ते देण्याचे अभिवचन दिले. "राजा आणि हामान यांनी उद्या देखिल मेजवानीस यावे ..." एस्तेरने अशी विनंती केली. मग ती राजाला आपली मागणी सादर करणार होती.
10
दरम्यानच्या काळात, मर्दखयला मारण्यासाठी, हामानाने खूप उंच फाशीचा खांब तयार केला.
11
त्या रात्री राजाला झोप येत नव्हती. राजाने इतिहासाचे पुस्तक वाचण्यास सांगितले तेंव्हा राजाला कळले की, राजाचे प्राण वाचवले त्याच्याविषयी मर्दखयला कोणत्याही प्रकारे सन्मानित केले नाही. दुसऱ्या दिवशी सकाळी, राजाने हामानाला विचारले, "एखाद्या मनुष्याचा मानसन्मान करण्याचे राजाच्या मर्जीस आल्यास त्या माणसाची कशी काय संभावना करावी?"
हे ऐकुन हामान खुश झाला, कारण राजा त्याच्याविषयीच विचार करित आहे असे त्याला वाटले.
12
मर्दखयला फाशी देण्याची परवानगी मागण्यास हामान राजाकडे आला होता. फाशीचा खांब तयार होता. आता तो वाट पाहू शकत नव्हता. उत्तेजीत होऊन, हामानाने त्याचा सल्ला सांगितला. तो म्हाणाला, "त्या मनुष्याला राजाचा पोषाख आणि राजमुकुट घाला."
13
"त्याला राजाच्या घोड्यावर बसवा. आणि शहरातील सर्वांनी हे पहावे म्हणून राजाच्या एका प्रमुख सरदाराने त्याला शहरातून मिरवावे." राजाने हामानास आदेश दिला, "त्वरा करुन, यहुदी मर्दखयचे तूं असेच कर."
14

संपूर्ण शहरभर मर्दखयचा मान-सन्मान करित हामान फिरला तेंव्हा त्याला कसे वाटले असेल? तो मर्दखयचा पुर्वी पेक्षा अधिक तिरस्कार करु लागला.



15

कदाचित त्याने मनातल्या मनात, "जरा थांब, मी तुला पाहून घेईन," असे म्हटले असावे. "इतर यहुदी लोकांबरोबर तो देखिल लवकरच मारला जाईल" असा त्याने विचार केला असावा.



16

त्या दिवसानंतर, हामान आणि राजा एस्तेर राणीच्या मेजवानीत आले. राजाने तिला विचारले, "तुझी मागणी काय आहे?" त्याने दिलेले वचन तो विसरला नव्हता. हामानाकडे बोट दाखवत एस्तेरने हामानाच्या सर्व दुष्ट योजनांविषयी राजाला सांगितले. राजाने म्हटले, "याला फासावर लटकवा."



17

यहुदी लोक स्वतःचा बचाव करु शकतात असा एक दुसरा कायदा राजाने पास केला. त्यांचा बचाव झाला ! मर्दखय हा राजाखालोखाल दुसऱ्या क्रमांकाचा अधिकारी बनला आणि सर्व यहुद्यांनी आनंद केला आणि त्यांनी एकमेकांना भेटी पाठविल्या. सुंदर राणी एस्तेर हिच्याव्द्वारे परमेश्वराने त्यांना कसे वाचवले याची आठवण यहुदी लोक आजदेखिल करतात.



18

सुंदर राणी एस्तेर

परमेश्वराची वाणी - बाइबल मधून गोष्ट

घेण्यात आली आहे

एस्तेर

"तुझ्या वचनांच्या उलगड्याने प्रकाश प्राप्त होतो."
स्तोत्रसंहिता ११९:१३०

ईश्वराला माहित आहे की आम्ही वाईट गोष्टी केल्या आहेत, ज्याला तो पाप म्हणतो. पापाची शिक्षा मृत्यू आहे.

ईश्वर आमच्यावर इतके प्रेम करतो की क्रॉसवर मरण्यासाठी आणि आमची शिक्षा भोगण्यासाठी त्याने आपल्या पुत्राला येशूला पाठविले. येशू पुन्हा जिवंत झाला आणि स्वर्गात परत गेला! आता ईश्वर आमच्या पापांसाठी क्षमा करू शकतो.

जर तुम्ही तुमच्या पापांपासून मुक्ती मिळवू इच्छिता, तर ईश्वराला हे सांगा: प्रिय ईश्वरा, येशू माझ्यासाठी मेला आणि आता पुन्हा जगतो आहे यावर माझा विश्वास आहे. कृपा करून माझ्या जीवनात ये आणि माझ्या पापांसाठी मला क्षमा कर, जेणेकरून आता मला नवीन जीवन प्राप्त होईल आणि नंतर मी कायम तुझ्याबरोबर राहीन. तुझे मूल होऊन तुझ्यासाठी जगण्यास मला मदत कर. आमेन. जॉन 3:16

बाइबल वाचा आणि ईश्वराशी रोज बोला!